स्पर्धक असतात. त्यातील जे जोडपं कमी गुण मिळवेल ते एका पाठोपाठच्या फेरीत बाद ठरवलं जातं. शारीरिक, मानसिक संवेदना आणि सहनशक्तीच्या या खेळात विजेत्या जोडप्याला एक भव्य बक्षीस देण्यात येतं.

◆ सोनीवर नवे प्रयोग

सोनी टीव्हीने रात्री ९ ते १० या स्लॉटमध्ये आपली फळी मजबूत केली आहे. या एक तासात सोनीवरील *कुसुम* आणि *कुटुंब* या दोन मालिकांच्या प्रसारणाचा निर्णय घेऊन दर्शकांना आकर्षित करण्याचा हुकमी मार्ग निवडला आहे. या दोन्ही एकता कपूरच्या मालिका आहेत. आता पुढचं पाऊल म्हणून सोनीने रात्रीच्या ८-३०च्या स्लॉटवरही आपलं लक्ष केंद्रित करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. सध्या या स्लॉटला स्टार आणि झी टीव्ही आघाडीवर आहेत. म्हणून या वेळेत सोनीने दोन जुळ्या बहिणींचं कथानक असलेली सीता और गीतावर बेतलेली *हुबहू* नावाची नवी मालिका सुरू करण्याचं ठरवलंय. या दोघी बहिणी आपापल्या भूमिकांची कशी अदलाबदल करतात त्याची गंमत या मालिकेत पाहायला मिळेल. याशिवाय फेब्रुवारी महिन्यापासून *डॉक्टर* नावाची आणखी एक नवी मालिका सोनीवर सुरू होत असून ती आठवड्यातून तीन वेळा प्रसारित होईल.

◆ स्टारची संजीवनी


झी टीव्हीवर वैद्यकीय व्यवसायावर आधारित *धडकन* ही मालिका प्रसारित होतेय आणि सोनीने डॉक्टर मालिकेच्या प्रसारणाची घोषणा केल्यावर स्टार टीव्ही गप्प बसणं शक्य आहे का? स्टारने लगेच *संजीवनी* मालिकेच्या प्रसारणाला सुरुवात करून सोनीवर कुरघोडी केली आहे. दर बुधवारी रात्री ९ ते १० या वेळेत म्हणजे *कौन बनेगा करोडपती*च्या जागी स्टारवर आता *संजीवनी* प्रसारित होते. मालिकेचं मुख्य आकर्षण आहे हिंदी चित्रपटातील अभिनेता मोहनीश बहल. पंधरा वर्षांच्या प्रदीर्घ गॅपनंतर मोहनीश छोट्या पडद्यावर दिसतोय. जवळजवळ दीडएक दशकापूर्वी आनंद महेंद्रूबरोबर मोहनीशने *इधर-उधर* या मालिकेत काम केलं होतं. डॉक्टरांच्या जीवनातील धावपळ, त्यांच्या आशा-निराशा, प्रेरणा यांचा परिचय या मालिकेतून देण्याचा प्रयत्न आहे. *संजीवनी*चे दिग्दर्शक आहेत कौशिक घटक.



*संजीवनी*मध्ये मोहनीश बहल आणि कुलभूषण खरबंदा

◆ अशोककुमारः छोट्या पडद्यावरील योगदान

निर्माता-दिग्दर्शक-अभिनेता देवेंद्र खंडेलवाल यांच्या मते स्व. अशोककुमार एक असे महान कलाकार होते. त्यांचं छोट्या पडद्यावरील योगदान विसरून चालणार नाही. हिंदी चित्रपटांप्रमाणेच त्याने लघुपट, प्रायोगिक चित्रपट आणि जाहिरातपटांतही वेगवेगळ्या भूमिका केल्या. छोट्या पडद्यावरील लोकप्रिय मेगा सिरीयल *हमलोग*चं अँकरिंग केलं होतं. बासू चटर्जी आणि देवेंद्र खंडेलवाल दिग्दर्शित *भीम भवानी*मध्ये त्यांनी विनोदी भूमिका केली होती. पाकिस्तानी सुरक्षा व्यवस्थेवर आधारित कृषिविषयक डॉक्युमेंटरी चित्रपट *सोना ही सोना*मध्येही दादामुनींनी काम केलं होतं. याशिवाय जे.के. सिमेंट आणि स्टॉम्पसाठीच्या जाहिरातपटात मॉडेलिंगही केलं होतं. देवेंद्र खंडेलवाल दिग्दर्शित सामाजिक जबाबदारीतून बनलेल्या पोलीओविषयक जागृतीपर चित्रपटात अशोककुमारांनी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून काम केलं होतं.



ऑलराऊंडर दादामुनी



अजून यौवनात मी!: अरुणा इराणीला वाढत्या वयाची काही अडचण येत नसावी. नुकत्याच सोनी टीव्हीवरील *बूगी वूगी* कार्यक्रमात जावेद, नावेद आणि रवी या त्रिकुटाबरोबर अरुणाने अशी धम्माल केली की ती गेल्या पिढीतली अभिनेत्री आहे हे कोणाला सांगूनही खरं वाटणार नाही.

◆ सहारावरच्या ढीगभर वाहिन्या

१६,००० करोड इतकी प्रचंड उलाढाल असलेल्या सहारा इंडियाने रौप्यमहोत्सवाच्या निमित्ताने राष्ट्रीय न्यूज चॅनल सुरू करण्याची घोषणा केली आहे. याशिवाय वेगवेगळ्या शहारांसाठी ३७ स्वतंत्र न्यूज चॅनल्स सुरू करण्याची सहाराची योजना आहे. या वाहिन्या त्या त्या शहरातील स्थानिक बातम्यांवर भर देणाऱ्या असतील. या ढीगभर वाहिन्या यु.पी., उत्तरांचल, एम.पी., छत्तीसगढ, राजस्थान, बिहार, झारखंड, मुंबई, दिल्ली आणि एनसीआर, लखनौ, भोपाल, जयपूर, पटणा, गोरखपूर, इंदौर, उदयपूर, रांची, ठाणे, नोइडा, वाराणसी, रायपूर, कोटा, भागलपूर, वाशी, गाजियाबाद, आग्रा, ग्वाल्हेर, बिकानेर, जमशेदपूर, फरिदाबाद, देहरादून, जबलपूर, जोधपूर, मुझफ्फर, गुरगांव, मेरठ, अजमेर, धनबाद, कानपूर, पुर्निआ, बरेली, चापरा, अलाहाबाद आणि गया येथे सुरू करण्यात येतील. ●